पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत आयोजित प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यानमालेत बोलताना किशोर बेडकिहाळ. सोबत डॉ. अशोक चौसाळकर, अवनिश पाटील, डॉ. अरुण भोसले.

# पंडित नेहरूंची भारताची संकल्पना सर्वसमावेशक

## किशोर बेडकिहाळ; प्राचार्य भोसले व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संवाद, सल्ला व चर्चा हा लोकशाहीचा आत्मा आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांना भारताचा प्रश्न हा सहिष्णुतेबरोबरच सहअस्तित्वाचा वाटत होता. त्यामुळे त्यांची भारताची संकल्पना ही सर्वसमावेशक व प्रत्येक घटकाच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी होती, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामार्फत आयोजित प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर हे होते. इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक इतिहास विभागमुख डॉ. अवनिश पाटील यांनी केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

तरुण भारत

# 'शिक्षणतज्ज्ञांनी एकसंघाने देशासाठी योगदान द्यावे'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित स्तुती कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सहभागी प्राध्यापक, विद्यार्थ्यांसह मान्यवर अधिकारी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधकांनी प्रत्येक विषयातील भिंती दूर करून एकत्र येऊन संशोधन केले पाहिजे. देशातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करण्यापेक्षा एकत्र येऊन, देशासाठी योगदान दिले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित स्तुती कार्यक्रम शिवाजी विद्यापीठातील सैफ डीएसटी-सीएफसी विभागात पार पडला. या कार्यक्रमाचा रविवारी समारोप झाला. स्टार्टअप इंडिया आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत देशातील नामांकित संस्थेतील संशोधकांना अत्याधुनिक उपकरणांची प्रत्यक्ष हाताळणी करता आली. स्तुतीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या नियोजनाचे सर्व सहभागींनी कौतुक केले.

मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रदीप सरवदे यांनी ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणाविषयी माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो टेक्नॉलॉजी विभागाचे डॉ. टी. डी. डोंगळे यांनी इलेक्ट्रिक मेजरमेंट टेक्निक्स अर्थात विद्युत मापन तंत्रे या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात दिल्ली, बंगलोर, मुंबई अशा प्रकारे देशातील विविध भागातून एकूण १४ तज्ज्ञांची व्याख्याने झाली. सहभागींसाठी कोल्हापूर दर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे अधिष्ठाता डॉ. एस. एच. ठकार, तळसंदेतील डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. प्रतापन यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. मकसूद वाईकर, आदिती गर्गे, अजित कांबळे, विजया इंगळे, सुप्रिया साठे, गायत्री पवार यांनी डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनासाठी कार्यशाळेची कामे केली. सूत्रसंचालन सत्यशीला घोंगडे आणि प्रज्ञा राजे यांनी केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

पुढारी

# महिला महाविद्यालयाचे यश

कोल्हापूर : सायबर ट्रस्ट संचालित कॉलेज ऑफ नॉनकन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमेनमधील एम. एस्सी. फूड सायन्स अँड न्यूट्रिशनच्या द्वितीय वर्षातील भावना अग्रवाल हिने शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धेत इंजिनिरिंग अँड टेकनॉलॉजी विभागातून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणाऱ्या आविष्कार स्पर्धेसाठी भावना अग्रवाल पात्र ठरली. तिला प्रा. श्वेता पाटील, प्रा. योगीता मिरजकर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिक्षणतज्ज्ञांनी देशासाठी योगदान द्यावे : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

देशातील शिक्षणतज्ज्ञांनी एकत्र येऊन देशासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण प्रशिक्षण कार्यशाळा (स्तुती) सैफ डीएसटी- सीएफसी विभागात झाली. प्रमुख पाहुणे म्हणून डी. वाय. पाटील, तळसंदे येथील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. के. प्रतापन, स्तुतीचे समन्वयक प्रा.डॉ. आर. जी. सोनकवडे आदी उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी मुंबई विद्यापीठाचे डॉ. प्रदीप सरवदे यांनी ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप उपकरणाविषयी माहिती दिली.

यावेळी सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या डीन प्रा. एस. एच. ठकार, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. के. डी. पवार, डॉ. मकसूद वाईकर, आदिती गर्गे, अजित कांबळे उपस्थित होते. सूत्रसंचालन सत्यशीला घोंगडे, प्रज्ञा राजे यांनी केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
12 DEC 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील इंटर्नशिप मेळाव्यात ११२ जणांची निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग, सेंट्रल प्लेसमेंट सेल व आयटी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने इंटर्नशिप मेळाव्यात ११२ जणांची निवड झाली आहे.

मेळाव्यात कोल्हापुरातील ३० आयटी कंपन्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप देण्यासाठी उपलब्ध होत्या. १२०० विद्यार्थी मेळाव्यात सहभागी झाले होते. उद्योग व शैक्षणिक संस्था यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण संधी उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे मत तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन सपली यांनी उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कविता ओझा यांनी प्रास्ताविक केले. सेंट्रल प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. गजानन राशीनकर यांनी उपक्रमाबाबत माहिती दिली. यावेळी आयटी असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. ऊर्मिला पोळ यांनी आभार मानले.

पुढारी

# 'जलसंधारण काळाची गरज'

कोल्हापूर : जलसंधारण ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. अमोल घाडगे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या वतीने 'जलसंधारण : घाडगेवाडी गावचा अभ्यास' या विषयावरील व्याखानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वायसीएसआरडीचे प्र.संचालक डॉ. नितीन माळी होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संतोष सुतार यांनी केले होते. डॉ. विशाल ओव्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता वड्राळे यांनी आभार मानले.